सं.फौ.खटला क्र.०१/२०१८
शासन वि. सुभाष
नि.क्र.१२ ची पूरवणी.
CNR No.MHJN090000042018

## न्यायनिर्णय

(दि. ०५ मार्च २०१९ रोजी घोषित)

१) उभय पक्षकारांच्या अभियोक्त्यांचा युक्तिवाद ऐकला.

२) आरोपीवरील दोषारोपावरुन पुढील मुद्दे माझे विचारार्थ निघत असून पुढील कारणास्तव त्यावरील मत खालीलप्रमाणे नोंदविणत येत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- |
| १) दि.२६/११/२०१७ रोजी १६.३० वाजता डोंगरगाव याठिकाणी आरोपी याने बेकायदेशीररित्या प्रत्येकी १८० मि.ली.च्या देशी दारुच्या १४ बाटल्या चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | ... नकारार्थी. |
| २) आदेश काय? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## : कारणमिमांसा :

**मुद्दे क्र.१ व २ बाबत**

३) आरोपीवरील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे वर्दीदार श्री.डोईफोडे (सा.क्र.१) व श्री.उपरे (सा.क्र.२) यांची साक्ष नोंदविण्यात आली. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ नुसार निवेदन नोंदविण्यात आले. त्यामध्ये आरोपी याने प्रस्तुतचे प्रकरण खोटे असल्याचे सांगितले. सहायक सरकारी

अभियोक्ता श्री.एस.बी.सुर्यवंशी यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच, आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.आर.पडोळ यांचा युक्तिवाद ऐकला.

४) वर्दीदार, श्री.डोईफोडे (सा.क्र.१) हे प्रकरणातील तपासिक अंमलदार आहे. त्यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये, घटना दि.२६.११.२०१७ रोजी घडल्याचे सांगितलेले आहे. ते पोलीस ठाणे, बदनापूर येथे हजर असताना त्यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मौजे डोंगरगाव येथे आरोपी त्याच्या ताब्यामध्ये बेकायदेशीररित्या देशी दारु बाळगून त्याची चोरटी विक्री करीत आहे. तेव्हा त्यांनी त्याठिकाणी १६.३० वाजता जाऊन छापा मारला असता आरोपीच्या ताब्यामध्ये प्रत्येकी १८० मि.ली.च्या देशी दारुच्या १४ बाटल्या मिळून आल्या. सदर बाटल्या दोन पंचासमक्ष जप्त करुन त्याचा जप्ती पंचनामा (नि.१३) नोंदविल्याचे त्यांच्या पुराव्यात आलेले आहे.

५) वर्दीदार यांनीच जप्ती पंचनामा नोंदविलेला आहे. ते पोलीस कर्मचारी असून पंचनाम्यावरील पंच यांना प्रकरणात तपासण्यात आलेले नाही. त्यामुळे, जप्ती पंचनाम्यातील मजकूराला स्वतंत्र साक्षीदाराच्या पुराव्याने पुष्टी मिळालेली नाही. जप्त बाटल्यांपैकी एक बाटली रासायनिक पडताळणीसाठी वेगळी ठेवली व वर्दी (नि.१४) दाखल केली. रासायनिक पडताळणीसाठी राखून ठेवलेला मुद्देमाल श्री.उपरे यांच्यामार्फत दि.२०.१२.२०१७ रोजी न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडे पाठविला, असे त्यांचे सांगणे आहे. पत्राची स्थळप्रत (नि.१५) अभिलेखावर दाखल असल्याचे त्यांच्या पुराव्यात आलेले आहे.

६) श्री.उपरे (सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये, जप्त केलेली एक काचेची

देशी दारुची सीलबंद बाटली न्यायवैद्यक प्रयोगशाळा, औरंगाबाद यांच्याकडे जमा करण्यासाठी त्यांना दिल्याचे सांगितले आहे. ती बाटली न्यायवैद्यक प्रयोगशाळा, औरंगाबाद याठिकाणी जमा केली व जमा केलेल्या बाटलीची स्थळप्रत (नि.१५) तपासणी अधिकारी यांच्याकडे दिल्याचे त्यांच्या पुराव्यातील म्हणणे आहे.

७) पोलीस कर्मचारी वगळता एकाही स्वतंत्र साक्षीदाराने अभियोग पक्षाला समर्थन दिलेले नाही. वर्दीदार हे पोलीस कर्मचारी असून त्यांच्या पुराव्याला स्वतंत्र साक्षीदाराच्या साक्षीने पुष्टी आलेली नाही. केवळ वर्दीदाराच्या एकमेव साक्षीवर विसंबून राहता येणार नाही. त्यामुळे, आरोपी याने स्वतःच्या ताब्यात व कब्जात दारुच्या बाटल्या चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने विनापरवाना बेकायदेशीररित्या बाळगल्या असे सिध्द झालेले नसल्यामुळे आरोपीस निर्दोष मुक्त करणे योग्य ठरेल. मुद्देमाल देशी दारुच्या बाटल्या अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे पुढील विल्हेवाट लावण्यासाठी पाठविणे योग्य होईल. सबब, मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदविण्यात येतो व मुद्दा क्र.२ ला अनुसरुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१) आरोपीला मुंबई दारुबंदी कायद्याचे कलम ६५(अ)(ई) अन्वये दंडनीय अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) च्या तरतुदीनुसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

२) आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे.

३) जप्त मुद्देमाल, प्रत्येकी १८० मि.ली.च्या देशी दारुच्या १४ बाटल्या अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे पुढील विल्हेवाट

नियमानुसार पाठविण्यात याव्यात .

४) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम रुपये पंधरा हजाराचे वैयक्तीक बंधपत्र सादर करुन पुर्तता केलेली आहे. सदरचे वैयक्तीक बंधपत्र हे सहा महिन्याच्या कालावधीपर्यंत वैध राहिल.

स्वाक्षरीत/–
दि. ०५/०३/२०१९
(श्रीमती भा. का. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
बदनापूर

<u>प्रमाणपत्र</u>

मी, शपथेवर निवेदन करतो की, प्रस्तूत पीडीएफ फाईल मधील मजकूर हा शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – वि.अ.ढोणे, लघुलेखक (नि.श्रे.)
न्यायालयाचे नांव – दिवाणी व फौजदारी न्यायालय बदनापूर.

स्वाक्षरीत/–
लघुलेखकाची सही